# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली-४१५ ७१२ जिल्हा रत्नागिरी

## मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

---

जा.क्र.मसंकें/प्रअवा/ लिलाव/५५२/ 351 /२०२२. दिनांक 1 FEB 2022

## आंबा फळे विक्री निविदा सुचना

(मोहोरलेल्या व फळधारणा झालेल्या स्थितित)

मध्यवर्ती संशोधन केद्र वाकवली, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी अंतर्गत असलेल्या वाकवली विभाग येथील सन २०२१–२२ या हंगामातील आंबा हापूस बागेतील आंबा फळ झाडे (प्रायोगिक झाडे वगळून) मोहोरलेल्या व फळधारणा झालेल्या स्थितीत निविदेव्दारे विक्रि करावयाची आहेत. आंबा गटांसाठी गट निहाय मोहोरबंद निविदा वार सोमवार दिनांक २१/०२/२०२२ रोजी सकाळी ११.00 वाजेपर्यंत मध्यवर्ती संशोधन केद्र वाकवली, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी या कार्यालयात स्विकारण्यात येतील. शक्य झाल्यास निविदा त्याच दिवशी सकाळी १२.00 वाजता उघडण्यात येतील. निविदेसाठी लागणारे कोरे निविदा फॉर्म, अटी/शर्ती रोख रक्कम रु.५00/- (रु.पाचशे मात्र) भरून दिनांक १८/०२/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये (शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ९ ते १.३० व दुपारी २ ते ४ या वेळेत व दि. २१/०२/२०२२ रोजी सकाळी १0 वाजेपर्यंत मिळतील. निविदा प्रसिध्द झाल्यापासून लिलावासाठी असलेल्या आंबा फळबागा कार्यालयीन वेळेत संपर्क साधून प्रत्यक्ष पाहता येतील. तसेच निविदा भरताना इसारा रक्कम (Earnest money) म्हणून प्रत्येक गटासाठी रू.२0000/- (रू.वीस हजार मात्र) रोख भरावयाचे आहेत.

निविदा भरण्यापुर्वी निविदाधारकाने बाजार समिती किंवा तत्सम व्यापारी परवाना आवश्यक असल्यास स्वतःच्या जबाबदारीने निविदा सादर करावयाची आहे.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

Scanned by CamScanner

जा.क्र.मसंकें/प्रअवा/४४२/३५१/२०२२,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी,
दिनांक 01 FEB 2022

प्रती,

मा.प्रभारी अधिकारी,
कृषिज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.

**विषय ः जाहिरात आंबा फळे विक्री निविदा सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) प्रसिध्द करणेबाबत....**

महाशय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागातील आंबा फळे विक्री निविदा सुचना (मोहोरलेल्या व फळधारणा झालेल्या स्थितीत) सोबत जोडली आहे. तरी सदर निविदा विद्यापीठ संकेतस्थळावर (www. dbskkv.org) प्रसिध्दी करणेस विनंती आहे. सोबत प्रसिध्दी नमूना जोडणेत येत आहे.

**सोबत** ः आंबा फळे विक्री निविदा सुचना
(मोहोरलेल्या व फळधारणा झालेल्या स्थितीत)

आपला विश्वासू,

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी

Scanned by CamScanner